॥ उठी श्रीरामा ॥

गायिकाः आशा भोसले
गीतः रविंद्र भट
संगीतः सुधीर फडके
चित्रपटः ते माझे घर

उठी श्रीरामा पहाट झली पूर्व दिशा उमलली।
उभी घेउनी कलश दुधाचा कौसल्या माऊली ॥ दृ. ॥

होमगृही या ऋषिमुनिंचे सामवेद रंगले।
गोशळेतुन कालवडींचे दुग्धपान संपले।
मंदिरातले भाट चालले गाउन भूपाळी ॥ १ ॥

काल दर्पणी चंद्र जाउनी सुमंत गेले गृहा।
त्याच दर्पणी आज राघवा सूर्योदय हा पहा।
वसिष्ठ मुनिवर घेउन गेले पुजापात्र राऊळी ॥ २ ॥

राजमंदिरी दासी आल्या रत्नदीप विझविण्या।
उठ राजसा पूर्वदिशेचा सुवर्णयज्ञ पाहण्या।
चराचराला जिंकुन घेण्या अरुणप्रभा उजळली ॥ ३ ॥